# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक २०/०२/२०२६ (शुक्रवार)**

## नागपूर ग्रामीण पोलिसांनी गंभीर गुन्हे करून वर्चस्व निर्माण करणाऱ्या तसेच दहशत पसरविणाऱ्या ४ आरोपीतांच्या टोळी विरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (MCOCA) अन्वये कारवाई केली.

**पोलीस स्टेशन बुटीबोरी** :— मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांचे मार्गदर्शनात बुटबोरी पोलीसांनी **गंभीर गुन्हे करून वर्चस्व निर्माण करणाऱ्या तसेच दहशत पसरविणाऱ्या आरोपीतांच्या** टोळीचा प्रमुख तसेच सदस्य अशा एकुण ४ आरोपीतांविरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम अन्वये कारवाई केली आहे. सदर टोळीचा प्रमुख आरोपी नामे क्रं १) लोकेश हिरालाल ढाबरे, वय २७ वर्षे, रा. रिधोरा, सातगाव, ता. जि. नागपूर हा असुन टोळी सदस्य आरोपी क्रं २) रितीक उमाशंकर मूंगेल, वय १८ वर्ष, रा. देवनगर कूंभार पारा, ता. देवनगर, जि. सूरजपूर, राज्य छत्तीसगढ क्रं ३) ब्रिजेश भईयालाल कूमार, वय २५ वर्ष, रा. सातगांव ता. हिंगणा, जि. नागपूर मूळ रा. शिवप्रसाद नगर, तह. भैथान, जि. सूरजपूर, राज्य छत्तीसगढ ४) ओमप्रकाश उर्फ पिंटू अनंतराम देवांगन, वय ३१ वर्ष, रा. शिवप्रसाद नगर, देवल्ला पारा, तह. भैथान, जि. सूरजपूर, राज्य छत्तीसगढ हे आहेत.

पोलीस स्टेशन बुटीबोरी येथे अप. क्र. २३/२०२६ कलम १०३(२), ३(५), २३८ भा.न्या.सं. प्रमाणे खुनाचा गुन्हा दाखल आहे. फिर्यादी नामे अभिजित वसंता नेवारे, वय २२ वर्ष, रा. निखाडे ले आऊट, सातगाव, ता. हिंगणा, जि. नागपूर यांनी बोरी पोलीस स्टेशनला माहीती दिली की ,दिनांक ०९/०१/२०२६ रोजी फिर्यादीचे वडील वसंता रामाजी नेवारे, वय ४८ वर्ष हे नेहमीप्रमाणे रात्री ०९/३० वा. पर्यंत त्यांच्या मोटारसायकल ने

कामावर गेले व दुस—या दिवशी दिनांक १०/०१/२०२६ रोजी सकाळी १०/०० वा. पर्यंत नेहमीप्रमाणे कामावरून घरी परत न आल्याने फिर्यादीने नातेवाईक व ओळखीचे लोकांकडे तसेच परिसरात त्यांचा शोध घेतला परंतु ते मिळून आले नाही. त्यांची मो.सा. सातगाव येथील एका दारूचे दुकानाजवळ सापडली. त्यामुळे फिर्यादीने पोलीस स्टेशन बुटीबोरी येथे त्यांचे वडील बेपत्ता असल्याबाबत मिसींग तक्रार दाखल केली. दिनांक १५/०१/२०२५ रोजी नमुद बेपत्ता व्यक्तीचा खुन झाल्याचे उघड झाल्याने नमुद प्रकरणी कलम १०३(१),३(५) भा.न्या.सं. २०२३ अन्वये खुनाचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचे तपासात पोलीसांना तांत्रिकपुराव्यावरून मृतक हे घटनेवेळी आरोपी नं. १ लोकेश हिरालाल ढाबरे, वय २७ वर्षे, रा. रिधोरा, सातगाव, ता. जि. नागपूर याचेसोबत असल्याचे निष्पन्न केले. पोलीसांनी लोकेश ढाबरे याला अटक करून त्याचेकडे विचारपुस केली असता आरोपी लोकेश याने सांगितले की,त्याने त्याचे साथीदारासह मिळुन वडगाव गुजर ,ता.जि नागपुर येथे नेवुन दारू पिण्याचे वादातुन मृतकाचा खून केला आहे. सदर गुन्हयातील आरोपी क्रं ३) ब्रिजेश भईयालाल कूमार, आणि ४) ओमप्रकाश उर्फ पिंटू अनंतराम देवांगन, या दोघांनी आरोपी क्र. १) लोकेश हिरालाल ढाबरे, आणि २) रितीक उमाशंकर मूंगेल, यांनी गून्हयात वापरलेले हत्यार व परीधान केलेले कपडयांची विल्हेवाट लावण्याचा प्रयत्न केला. तरीसुध्दा पोलीसांनी कौशल्यपुर्ण तपास करीत गुन्हयातील चारही आरोपी यांना गुन्हयात अटक करून सदर गून्हयातील जैविक पुरावे, तसेच गुन्हयात वापरलेले हत्यार आणि वाहन जप्त केले.

पोलीसांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास केला असता असे निदर्शनास आले की, सदर गुन्हा हा संघटीतरित्या केलेला असुन नमुद संघटित गुन्हेगारी टोळीचा प्रमुख लोकेश हिरालाल ढाबरे हा आहे. टोळी प्रमुख हा परिसरात त्यांचे टोळीची दहशत पसरविण्यासाठी टोळीच्या सदस्यांसह खुन करणे, प्राणघातक शस्त्र बाळगणे, चोरी करणे, जबरी चोरी करणे, वेगाने वाहन चालवून दूखापत करणे, अवैधरित्या अंमली पदार्थांचे सेवन करणे अशा प्रकारचे गंभीर स्वरूपाचे गुन्हे करीत असतो. नमुद टोळीचा प्रमुख लोकेश हिरालाल ढाबरे याचे वर पोलीस स्टेशन बुटीबोरी, एमआयडीसी बोरी, नागपुर शहर अंतर्गत इमामवाडा, सक्करदरा, हिंगणा, आपीएफ अजनी येथे एकुण ९ गंभीर गुन्हे दाखल आहे. आरोपी लोकेश हिरालाल ढाबरे याने आपले टोळी मध्ये स्थानिक व आंतरराज्यातील नव नविन सदस्यांना घेवुन यापुर्वी

सुध्दा नागपूर ग्रामीण व नागपुर शहर जिल्हयातील विवीध पोलीस स्टेशनचे हद्दीत जबरी चोरी, प्राणघातक शस्त्र बाळगणे, वाहन चोरी करणे, वेगाने वाहन चालवून दुखापत करणे, अवैधरित्या अंमली पदार्थांचे सेवन करणे संबधात अनेक गुन्हे केल्याचे निष्पन्न झालेले आहे. आरोपीतांचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी त्यांचेवर गुन्हे नोंद करून प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपीतांनी त्यांची गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली.

**बुटीबोरी पोलीसांनी नमुद ४ आरोपीतांच्या टोळी विरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ (MCOCA) अन्वये प्रस्ताव तयार करून मा. पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्फतीने मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांचे कडे सादर केला असता मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांच्या कार्यालयाकडुन सदर प्रस्तावाला मंजुरी मिळाल्याने सदर गुन्हयात महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ (MCOCA) अन्वये कलमवाढ करण्यात आली आहे.**



**लोकेश हिरालाल ढाबरे**




रितीक उमाशंकर मूंगेल



ब्रिजेश भईयालाल कूमार



**ओमप्रकाश उर्फ पिंटू अनंतराम देवांगन**

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद ०७ गोवंश जनावरांची सुटका, केळवद पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन केळवद** :— दिनांक २०/०२/२०२६ रोजी केळवद पोलीसांना माहीती प्राप्त झाली की, अवैधरित्या गोवंश जनावरांची वाहतुक केली जात आहे. अशी माहीती मिळताच पोलीसांन सदर वाहन शोध कामी सतर्क पेट्रोलींग केली असता बिहाडा फाटा येथे एक संशयीत टाटा कंपनीची मांझा कार क्र. क्र. एम एच २७ ए सी ७५७६ हे वाहन दिसुन आले. त्यास थांबण्याचा इशारा केला असता पोलीसांना पाहुन सदर वाहन चालकाने त्याचे वाहन न थांबवता पळविण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे संशय अधिक बळावल्याने पोलीसांनी नमुद वाहनाचा पाठलाग केला असता आरोपी वाहन चालकाने आपले वाहन रोडच्या कडेला थांबवुन झाडा झुडपाचा फायदा घेवुन पळुन गेला. पोलीसांनी पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता कार मधील मागील सिट काढुन त्यामध्ये ०७ गोवंश जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, निर्दयतेने शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले.

**पोलीसांनी पंचासमक्ष  घटनास्थळावरून** संशयीत टाटा कंपनीची मांझा कार क्र. एम एच २७ ए सी ७५७६ **किंमती २,५०,०००/— रूपये आणि ०७ गोवंश जनावरे किंमती १,०५,०००/— रूपये असा एकुण किंमती ३,५५,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला.**

नमुद प्रकरणी पोलीस स्टेशन केळवद येथे मांझा कार क्र. एम एच २७ ए सी ७५७६ च्या चालका विरूध्द कलम २८१ भान्यासं,कलम ११(१)(जी),११(१)(डी),११(१)(सी),प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियम, कलम ५,९ महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम, कलम ११९ मपोका, कलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.




## अवैधरीत्या विनापरवाना देशी दारूची वाहतूक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणची कामगिरी

**पोलीस स्टेशन बोरी** :— दिनांक १९/०२/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अवैध धंदयावर कारवाई कामी  नागपूर उपविभागात पेट्रोलींग करीत असतांना पोलीस पथकाला गुप्त बामीदारा द्वारे खात्रीशीर माहीती मिळाली की,दुचाकी वाहनाने अवैधरीत्या देशी दारूची

वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा रूईखैरी येथे नाकाबंदी केली असता स्प्लेंडर मोटर सायकल क्र. एम एच—४०/सी एफ ००२९ ही मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता देशी दारू मिळुन आली. **आरोपी नामे अरविंद देवराव मडावी, वय ३७ वर्ष, रा. रूईखैरी ता. जि. नागपूर** हा अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करतांना मिळुन आला.

**पोलीसांनी पंचासमक्ष १) २४ देशी दारूच्या निपा किमती १९२०/— रूपये आणि स्प्लेंडर मोटरसायकल क्र. एम एच—४०/सी एफ ००२९ किंमती ३५,०००/—रूपये असा एकुण किंमती ३६,९२०/—रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद आरोपीविरूद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा दाखल केला आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री, वाहतुक तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०८ गुन्हे नोंद

नागपुर ग्रामीण जिल्हयात दिनांक १९/०२/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू काढणारे, दारू बाळगुन विक्री, वाहतुक आणि सेवन करणाऱ्यांवर छापा टाकुन **मोहाफुल दारू, देशी दारू तसेच वाहन असा एकुण ४२,११५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**पोलीस स्टेशन कुही** येथे आरोपी नामे प्रेमदास मारूजी कामठे, वय ६८ वर्ष, रा. वगटोली ता. कुही याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बोरी** येथे आरोपी क्र. १) राहुल श्रावण नगराळे, वय ५४ वर्ष, रा. चिंतामधी शाळेजवळ टाटा इंडिकॉन टावर मागे सातोडा आलोडी वर्धा ता. जि. वर्धा आणि २) अरविंद देवराव मडावी, वय ३७ वर्ष, रा. रूईखैरी ता. जि. नागपूर यांचे वर प्रत्येकी १ गुन्हा असे २ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे गोपाल रामचंद्र राऊत, वय ३५ वर्ष, रा. येणीकोणी ता. नरखेड याचेवर १ गुन्हा, **पोलीस स्टेशन देवलापार** येथे आरोपी क्र. १) रज्जन दुरनसिंग मरस्कोल्हे, वय ४५ वर्ष, रा. बोथीया पालोरा, ता. रामटेक जि. नागपूर २) महिला आरोपी यांचे वर प्रत्येकी एक गुन्हा असे २ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन अरोली** येथे आरोपी क्र. १) रामकृष्ण माधोजी निमकर, वय ४९ वर्ष, रा. सिरसोली ता. मौदा २) महिला आरोपी यांचे वर प्रत्येकी एक

गुन्हा असे २ गुन्हे नोंद, अशा आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ०८ गुन्हे दाखल केले आहे.

**नमुद कारवाईत एकुण १) २० लिटर मोहाफुल गावठी दारू २) ११७०० मिली देशी दारू तसेच वाहन असा एकुण ४२,११५/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने